आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक ३३३ वा ● मंगळवार दि. २८ मे २०२४ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●

## शरद पवारांच्या 'लेडी जेम्स बाँड' मागच्या दरवाजाने अजित पवारांच्या बैठकीला

मुंबई : राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या युवती अध्यक्ष सोनिया दुहान राजीनामा देण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवकचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या पाठोपाठ आता सोनिया दुहानही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेवर आहेत. मात्र दुहान यांनी या सर्व चर्चा फ टाळल्या. मात्र आज अजित पवारांसोबत जाण्याच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाले असून सातत्याने पक्षप्रवेशाच्या बातम्या फ टळणाऱ्या सोनिया दुहान अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या बैठकीसाठी मागचा दरवाज्याने पोहचल्या आहेत.

धीरज शर्मा यांच्यासोबत सोनिया दुहान देखील उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. मात्र आज दुहान बैठकीसाठी पोहचल्याने अखेर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवार गटात प्रवेश करण्याच्या बातमीवर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे.

## हातमाग, वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेसाठी १० जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि.२७ (विमाका) : केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहासत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इच्छुकांनी १० जून २०२४ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज सादर करावेत, असे आवाहन वस्त्रोद्योग आयुक्त अविष्यांत पंडा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे केले आहे. महाराष्ट्रातून हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता बरगढ (ओडिशा) येथे १३ जागा व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता १ जागा तसेच वेंकटगिरी येथे २ जागेच्या प्रवेशासाठी तसेच व्दितीय वर्षाकरिता ३ (१ जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता) जागेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी नागपूर, सोलापूर, मुंबई व छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग कार्यालयांमार्फत १० जून २०२४ पर्यंत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी याबाबतचे परिपूर्ण अर्ज १० जून २०२४ पर्यंत संबंधित प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करावेत. उमेदवारांकरिता अधिक माहिती, प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या ह्िीि.वळींशारह.र्सो. ळप या संकेतस्थळावर तसेच सर्व प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रोद्योग यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, असेही कळविले आहे.

## मनपाच्या सावित्रीबाई फुले शाळेचा शंभर टक्के निकाल

लातूर/प्रतिनिधी: २०२३- २४ या शैक्षणिक वर्षात झालेल्या शालांत परीक्षेत मनपाच्या पीएमश्री सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक ९ चा निकाल १०० टक्के लागला आहे.या यशाबद्दल मनपा आयुक्तांसह अधिकाऱ्यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. या शाळेतील विनायक विजयकुमार जाधव हा ८९.२० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम आला.त्या खालोखाल ८०.६० टक्के गुण घेणारा रोहित मंगलसिंग खिक्ची याने शाळेतून दुसरा क्रमांक पटकावला.वैभव शामराव फुलारी यास ७९ टक्के, पायल महादेव क्षीरसागर हिला ७८.२० टक्के, रूपाली पांडुरंग परांडे या विद्यार्थीनीस ७५.८० टक्के,पुजा दामा हिला ७५.२० टक्के गुण मिळाले.परीक्षेला बसलेले शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे,अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार,उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे-पाटील शिक्षणाधिकारी साहेबराव जाधव यांनी उत्तीर्ण विद्यार्थी,शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## पीकविम्यासाठी शेतकरी औशात दिवसा मशाल पेटवणार

औसा :सरकारचे धोरण म्हणजे शेतकऱ्याचे मरण आहे. याची प्रचिती आजच्या सरकारकडे पाहिल्यावर येते. सतत खोटी आश्र्वासने देऊन सत्तेत येऊन शेतकऱ्याची माती करणाऱ्या सरकारने १० जून पूर्वी पीकविमा आणि विविध तलावातून स्वखर्चाने गाळ काढलेल्या शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये द्यावे अन्यथा १८जून रोजी औशात सरकार विरोधात दिवसा मशाली पेटवल्या जातील असा इशारा शेतकरी नेते राजेंद्र मोरे आणि राजीव कसबे यांनी मुख्यमंत्र्यांना तहसीलदार यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात दिलेला आहे. खरीप हंगामाच्या मशागती सुरु झालेल्या आहेत. अगोदरच शेतकरी मागील वर्षी निसर्गाच्या अस्मानी संकटात बेजार झालेला असताना सरकारने सुलतानी संकट घालून शेतकऱ्यांना अधिकच अडचणीत टाकण्याचे महापात केले आहे.सोयाबीनचा पडलेला भाव, शेतकऱ्यांची तूर अन साठेबाजार करणाऱ्या व्यापाऱ्याची सुगी हे सरकारने जाणून बुजून ठरवले आहे. उत्पादन खर्च प्रचंड वाढला मात्र उत्पाद्दीत माल बेभाव किमतीत विकावा लागला पर्यायाने शेतकरी उध्वस्त झाला आहे पावसात खंड,येलो मोझ्याकच्या प्रादुर्भावामुळे सरकार ने तातडीने मदत देणे आवश्यक होते परंतु सत्तेच्या मस्तीत गुंग असणाऱ्या सरकारला शेतकऱ्यांचे दुःख काय कळणार अन विरोधी पक्षाचे सामान्य शेतकऱ्यांप्रति असलेले पुतळा मावशीचे प्रेम कोणत्या कामाचे असा प्रश्न निर्माण झालेला आहे.




## व्ही एस पँथर्स सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न !

लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी संध्याकाळी सात वाजता विश्र्वरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. या विवाह सोहळ्यातील नवदांपत्यांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री अमित देशमुख, आमदार अभिमन्यू पवार, माजी राज्यमंत्री विनायक पाटील अहमदपूर, विधानसभेचे आमदार बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर माजी मंत्री बसवराज पाटील, शैलेश लाहोटी, पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक रामभाऊ जगदाळे रविदास या धर्म संघटनचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखदेव महाराज, सोलापूरचे आरजी ग्रुपचे अध्यक्ष पिंटू डावरे, पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक प्रशांत अण्णा म्हस्के, उद्योजक दीपक कवडे, श्रीनिवास वाघ पुणे, यांच्यासह भाजपा युवा नेते अजित सिंह पाटील, माजी नगरसेवक, पुनीत पाटील, युनूस मोमीन,विनोद मुळे, नितीन लहाने, डॉ मेघराज चावडा, डॉ मारुती कराळे, डॉ सुरेंद्र चव्हाण, डॉ मंगेश बनसोडे,डॉ रविराज पोरे, अफजल कुरेशी ,अन्वर शेख, काँग्रेस नेते किरण जाधव,श्रीशैल्य उटगे, नगरसेविका भाग्यश्री कौळखेरे, संग्राम



ठेसे बसवराज धाराशिवे युवा नेते मयूर बनसोडे ,नागेश कांबळे, किशोर भाऊ गायकवाड माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, लाला सुरवसे,नवनाथ आलटे सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी यावेळी माजी पालकमंत्री अमित देशमुख यांनी या विवाह सोहळ्याच्या नियोजनाबद्दल विनोद खटके आणि सचिन मस्के यांचे अभिनंदन केले. तसेच अभिमन्यू पवार यांनी सदैव विनोद खटके आणि सचिन भाऊ मस्के यांच्या सोबत राहण्याचे आश्र्वासन दिले. विनायकराव पाटील यांनी विनोद खटके यांच्या कार्याचा गौरव केला. बसवराज पाटील यांनी विवाह सोहळ्याला उपस्थित राहून नवदांपत्यास शुभ आशीर्वाद प्रदान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सर्व धर्मीय विवाह सोहळ्यामध्ये हिंदू मुस्लिम बौद्ध धर्मीय जोडप्यांचा विवाह त्यांच्या त्यांच्या धार्मिक विधीनुसार पार पाडण्यात आला.

विवाह सोहळ्याच्या सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माजी पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार पुष्पहार अर्पण करण्यात आला, आणि अभिवादन करण्यात आले. हा पाचवा सर्व धर्मीय सामुहिक विवाह सोहळा पार पाडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन भाऊ मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव, अमोल सुरवसे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विशाल गायकवाड ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ ऑटो संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड शहराध्यक्ष असद भाई शेख कामगार आघाडीचे गौस शेख ,युनूस शेख,गोविंद कांबळे रवी कांबळे मनोज गायकवाड अतुल होळकर विनोद वाकचौरे राज तर कसे सुनील सातपुते संतोष माने सचिन गवळे सिद्धार्थ किनीकर यासीन शेख रमजान शेख सुरत सूर्यवंशी जगदीश सर्व दे अक्षय कांबळे असिफ कांबळे अजय सूर्यवंशी देवानंद बनसोडे, रमेश सरवदे दाजी कांबळे मेघराज जेवळीकर श्रीहरी केंद्रे मार्गदर्शक रवी कुरील संतोष मांदळे सह व्हीएस पँथरच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. भगवान पवार यांचे निलंबन महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार

मुंबई, : जिल्हा परिषदेचे तत्कालिन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान अंतू पवार यांच्याविरुद्ध विविध तक्रारी प्राप्त होत्या. यामध्ये आर्थिक भ्रष्टाचार, लैंगिक छळ आदींचा समावेश होता. या प्रलंबित तक्रारींची दखल राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने घेऊन सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समितीने घेतलेल्या निर्णयानुसार डॉ. पवार यांचे निलंबन महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार करण्यात आले आहे, असे उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी स्पष्टीकरणात कळविले आहे.

डॉ. भगवान पवार यांना बडतर्फ नव्हे तर निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या काळात चौकशी अधिक नि:पक्षपातीपणे व्हावी यासाठी त्यांना नंदुरबार येथे मुख्यालय देण्यात आले आहे. या चौकशीदरम्यान त्यांना आणि संबंधित तक्रारदारांना आपले म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी असणार आहे.

डॉ. भगवान पवार यांच्याविरुद्ध कंत्राटी महिलांच्या लैंगिक शोषणाच्या अनेक तक्रारी विभागाला प्राप्त झाल्या होत्या. त्याशिवाय अनियमित कामकाज, अधिकारी/ कर्मचाऱ्यांसोबत अरेरावी, त्यांना मानसिक व आर्थिक त्रास देणे, आर्थिक घोटाळ्यांचे गंभीर आरोप अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या. सतत तक्रारी प्राप्त होत असल्याने २९ एप्रिल रोजी आरोग्य सेवा आयुक्तालयाने सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याचा समावेश असलेली तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती.

डॉ. पवार यांच्या विरुद्ध असणाऱ्या तक्रारीसंदर्भात सखोल चौकशी करुन समितीने अहवाल दिला. त्यानुसारच डॉ. पवार प्रथमदर्शनी दोषी आढळून आले व त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. डॉ. पवार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ (१) (अ) मधील तरतुदीनुसार निलंबित करण्यात यावे तसेच निलंबन कालावधीत डॉ. पवार यांचे मुख्यालय जिल्हा रुग्णालय, नंदूरबार येथे ठेवण्यात यावे अशी चौकशी समितीने शिफारस केली व त्यानुसार निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच पुढील सविस्तर चौकशी व विभागीय चौकशी करण्यात येणार आहे. यात कोणताही हस्तक्षेप होऊ नये म्हणून डॉ. पवार यांना निलंबित करण्यात आले आहे. डॉ. पवार यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तीचे पालन करणे आवश्यक असताना त्यांनी त्याचा भंग केला असल्याचे स्पष्टीकरण आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

## जल जीवन मिशनच्या कामांना गती देण्यासाठी शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, (जिमाका) : जिल्ह्यातील जल जीवन मिशन




योजनेच्या कामांना गती देण्याबाबत वारंवार सूचना देवूनही काही कामे अद्यापही अपेक्षित गतीने होत नसल्याचे दिसून येत आहे. या कामांना गती देण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

पाणी टंचाई उपाययोजना आणि जल जीवन मिशनच्या कामांचा आढावा घेण्यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, उप अभियंता यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांची यावेळी उपस्थिती होती.

जल जीवन मिशनच्या विहिरी, बांधकामे यासारखी कामे पावसाळ्यापूर्वी होणे आवश्यक आहे. तसेच ज्या गावातील योजनेचे किरकोळ काम शिल्लक आहे, अशी कामे येत्या सात दिवसाच्या आत पूर्ण करावीत. जागेची अथवा इतर अडचणीमुळे कामांमध्ये दिरंगाई होत असल्यास तहसीलदार, गट विकास अधिकारी, संबंधित उप अभियंता, ग्रामसेवक यांनी समन्वयातून याविषयी तोडगा काढावा. तसेच अद्यापही अपेक्षित प्रगती नसलेल्या कामांना गती देवून ही कामे लवकरात लवकर पूर्ण होतील, यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच यापुढे या योजनेचा दैनंदिन आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पाणी टंचाईच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने कार्यवाही जलदगतीने होण्यासाठी उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे याबाबतचे कोणतेही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच प्रत्येक तालुकानिहाय उपाययोजनांचा आढावा घेतला.

जल जीवन मिशनची काम तातडीने पूर्ण करण्यासाठी यापूर्वी देण्यात आलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या योजनेच्या कामात कोणत्याही प्रकारचा अडथळा आणल्यास संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात येईल. गट विकास अधिकारी यांबी याबाबत अहवाल सादर करावेत, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. तसेच पाणी टंचाईच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा त्यांनी आढावा घेतला.

## लातूरला महात्मा बसवेश्र्वर विद्यापीठ निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार माजी ग्राम विकास मंत्री बस्वराज पाटील मुरुमकर

लातूर : श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूरची मुहूर्तमेळ १९६०च्या कालावधीमध्ये महात्मा बसवेश्र्वर यांच्या विचाराला अनुसरून देशीकेंद्र महाराजांनी केली. त्यावेळी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे लावलेले इवलेसे रोपटे आज वटवृक्षाच्या स्वरूपामध्ये आपणास दिसून येत आहे. या संस्थेअंतर्गत शाळा, महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये मिळून एकूण १६ यूनिट्स चालविले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला अनुसरून लातूरमध्ये महात्मा बसवेश्र्वर विद्यापीठ निर्माण करण्यासाठी केंद्र आणि राज्य पातळीवर आपणास सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी ग्राम विकास मंत्री बस्वराज पाटील मुरूमकर यांनी केले.

लिंगायत शरण फाउंडेशन, (महा.)च्यावतीने श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी सत्कार सोहळा भालचंद्र ब्लड बँक सभागृहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उप महापौर चंद्रकांत बिराजदार, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह अध्यक्ष आदिनाथ सांगवे, सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक गुरुलिंग धाराशीवे आणि संचालक महेश हालगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात होऊन उत्तम भूतके यांनी संगीतमय स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना बसवराज पाटील मुरूमकर म्हणाले की, संस्था ही समाजाने दिलेली देणगी असते. त्यामुळे संस्थेच्या माध्यमातून समाजातील



सर्वसामान्य लोकांच्या कल्याणाचा व सेवेचा सातत्याने संस्था पदाधिकाऱ्यांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे. नवनिर्वाचित संस्था पदाधिकाऱ्यांना समाजाने दिलेली जबाबदारी त्यांच्या दूरदृष्टी विचारामुळे यशस्वीरित्या पार पाडतील आणि पुढील ५० वर्षात संस्थेला वैभवशाली बनविण्याचा सातत्याने प्रयत्न करतील. नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि नवनिर्वाचित सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांचे कामाचे कौतुक करून सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. या संस्थेच्या सर्व युनिटद्वारे भविष्यात उज्वल यश प्राप्त करणारी भावी पिढी निर्माण केली जाईल त्यासाठी संस्थेच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे सहकार्याच्या भूमिकेत असल्याचे सांगून लिंगायत शरण फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर साहेबांना श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेविषयी एक वेगळी आपुलकी आहे. या संस्थेतील नवनिर्वाचित सर्व पदाधिकारी हे चाकूरकर परिवाराचे सदस्य आहेत. आमचे संपूर्ण कुटुंब या संस्थेच्या सोबत आहे. संस्था ही समाजातील प्रत्येकाची असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विश्र्वास आणि अपेक्षा या संस्थेमार्फत पूर्ण केल्या पाहिजे. या संस्थेतील आदिनाथ सांगवे काका, माधवराव पाटील टाकळीकर आणि इतर सर्व संचालक मंडळातील पदाधिकारी सामाजिक भावनेने कार्य करणारी वरिष्ठ मंडळी असल्यामुळे या संस्थेद्वारे गुणवंत व गुणवान विद्यार्थी भविष्यामध्ये निर्माण केले जातील. यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांना वेळ द्यावा लागेल असे सांगून त्यांनी नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी व लिंगायत शरण फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे मनापासून कौतुक करून अभिनंदन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी महापौर चंद्रकांत बिरादार म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी हातात घेतलेले कार्य सिद्धीस जाते याचा मला पूर्ण विश्र्वास आहे. या संस्थेद्वारे असलेल्या विविध प्रकारच्या शाळा, महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातून शैक्षणिक सेवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून लवकरच ही संस्था मराठवाडा, महाराष्ट्र आणि देशभरात नावारूपास येईल असा आशावादही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

यावेळी संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला अनुसरून शासकीय प्रक्रिया निस्वार्थ भावनेने पार पाडली आहे. आम्हा सर्वांना महात्मा बसवेश्र्वर आणि देशिकेंद्र महाराज यांचा ईश्र्वररुपी आशीर्वाद मिळाला आहे. संस्थेमध्ये विश्र्वस्त म्हणून चॅरिटी स्वरूपात काम केले पाहिजे. चॅरिटी म्हणजे घरचे खायचे आणि बाहेरचे सामाजिक कार्य करायचे असा त्याचा अर्थ आहे. देशीकेंद्र महाराजांनी लावलेल्या रोपट्याचे रूपांतर आज मोठ्या वटवृक्षात झालेले आहे. त्याच्या सावलीमध्ये आपण सर्वांचा आणि समाजाचा विकास होईल. हे विराट आणि वाळवंटात काम करण्यासारखे आहे. पण या विकासरुपी मार्गातील काटे जरी आम्ही दूर करू शकलो तरी महात्मा बसवेश्र्वर आणि देशीकेंद्र महाराजांच्या विचाराचे स्वप्न पूर्ण होईल. आज बोलण्यापेक्षा कार्य करणे आवश्यक आहे. आम्ही सर्वांनी पुढील पन्नास वर्षाचे संस्था विकासाचे नियोजन केल्याचे सांगून त्यांनी उपस्थित मान्यवर आणि लिंगायत शरण फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे सहृदय आभार मानले.

यावेळी संस्थेचे नानिर्वाचित सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, शरण म्हणजे आश्रय देणे. महात्मा बसवेश्र्वरांच्या विचाराने पुनीत झालेली आणि देशीकेंद्र महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली मराठवाड्यातील ही पहिली शैक्षणिक संस्था आहे. देशीकेंद्र महाराजांनी १९४२मध्ये आपण समाजाचे देणे लागतो या उद्देशाने माधुकरी मागून वस्तीगृहाची निर्मिती केली. याच वस्तीगृहातून आज मोठ मोठे अधिकारी निर्माण झाले आहेत. या संस्थेच्या उभारणीमध्ये ॲड. सांबप्पा गिरवलकर, मल्लिकार्जुनप्पा बिडवे, रामराव कवठाळे, विजयकुमार शेटे आदीं मान्यवरांचे मौलिक मार्गदर्शन व सहकार्य मिळाले आहे. या संस्थेला देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, बसवराज पाटील मुरूमकर, अर्चनाताई पाटील चाकूरकर आणि चंद्रकांत बिराजदार आदि मान्यवरांचे सुद्धा सातत्याने मार्गदर्शन मिळात आहे. महात्मा बसवेश्र्वरांच्या कायक वे कैलास या कर्मवादी सिद्धांताला अनुसरून भविष्यात संस्थेचे कार्य केले जाईल. आज लिंगायत समाजाला एकत्र येण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आपल्या देशात लोकशाहीची स्थापना मॅग्नाकार्टा यांनी केली नसून महात्मा बसवेश्र्वरांनी बाराव्या शतकात ७७० विविध अठरापगड जातीतील लोकांना एकत्र करून अनुभव मंडपच्या माध्यमातून निर्मिती केली. भविष्यामध्ये आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचे वाटचाल जलद गतीने घडून येईल असे सांगून संस्थेमध्ये आम्ही मालक म्हणून नव्हे तर सेवक म्हणून कार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली दिली.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# मुजरा विरुद्ध महामुजरा...!

## संपादकीय...

लोकशाहीत जशास तसे उत्तर देणे, वागणे, बोलणे हा घटनादत अधिकार आहे. पण त्यास मर्यादा आहेत, असाव्यात लागतात. त्याचे अनुकरणही करणे तितकेच महत्त्वाचे असते पण भारतीय लोकशाही एवढी उदंड व उतावीळ आहे, आपण काय व कशासाठी करतो, बोलतो आहोत. हेही भान त्या,त्या व्यक्तींना असेल, नसेल तर त्यांच्या, त्यांच्या शहाणपणाचे कौतुकासह गरज पडल्यास वाघाडे निघण्याशिवाय राहत नाही. हा लोकशाहीतील एक दंडक आहे. तो आपण स्वीकारला अनुकरण केलाच पाहिजे, हे तमाम भारतीयाचे आद्य कर्तव्य ठरते. यात कोणाची दुमत नसावी असे वाटते.

भारतीय राजकारणात लोकशाही निवडणुका आणि सत्ताकारणाला अनन्यसाधारण महत्त्व असते. सध्या भारतात लोकसभा निवडणुका होऊ घातल्या असून, प्रचाराने टप्प्या टप्प्यातील निवडणुकीचा प्रचार, प्रसार शेवटच्या टप्प्यात असताना, भाजपाची महायुती आघाडी आणि काँग्रेसची महाविकास आघाडी चुरशी लढत होत आहे. इंडिया महाविकास आघाडी ही भाजपा, महायुतीला त्यांची जागा दाखवून देऊ म्हणते, तर भाजपाची मोदी माहिती ४०० पार ची विजयाची खात्री देऊन काँग्रेसचे तमाम विरोधी पक्षांना सेवानिवृत्तीचा संकेत देत असल्याचे भारतीय राजकारणाचे जग भरातील पत्रकार, राजकीय नेते ही भारताच्या लोकसभा निवडणूक निकालाकडे लक्ष केंद्रित करून बसल्याने, शेवटच्या टप्प्यातील मतदान आणि चार जून चा निकाल यावर महायुती महाविकास आघाडीचे महा भवितव्य आणि अशा अपेक्षा गव्हाही दावे वगैरेचा खेळ होणार आहे. आणि यातूनच मोदी आघाडी की इंडिया आघाडीचे यश अपयश सिद्ध होणार आहे. परंतु शेवटी शेवटी प्रचारातून जी घसरण होते आहे, त्या संदर्भात राजकीय वर्तुळासह प्रसार माध्यमात कमालीची अस्वस्थ पसरली असल्याचे चित्र दिसते आहे.

बिहार मधील लोकसभा निवडणूक प्रसार, प्रचार सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस इंडिया महाविकास आघाडीवर मुस्लिम मतपिढीसाठी मतदारासमोर मुजरा करून लाचारी पत्करून काँग्रेस इंडिया आघाडीने लाचारी, गुलामीचा कळस गाठला असून एससी, एसटी, ओबीसी चे आरक्षण रद्द करून ते मुस्लमानांना देऊ पाहणाऱ्या काँग्रेस इंडिया महा विकास आघाडी गारद करून भारत शक्तीशाली बनवण्यासाठी भाजप महायुतीला विजय करा असे भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले असले तरी तेही प्रचार सभेतून मतदारांना मतदानाचा जोगवा मागतच आहेत. ही मोदीने लक्षात ठेवावे असा सल्ला काँग्रेस मधून भाजपात जाऊन राज्यसभा खासदार झालेल्या एका खासदारानी घरचा आहेर दिल्यानेच भाजपात उलट सुलट प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत, यात संदेश असावा.

संविधान आणि आरक्षणाला काँग्रेस भाजपच काय तर कोणतीही शक्ती हात लावू शकत नाही. बदलू शकत नाही. परंतु आरक्षण संविधानाकडून मताची भिक मागणारे काँग्रेस, भाजपावाल्यांनी आपले अवकात बघूनच निवडणूक प्रचार, प्रसार राजकारण सत्ताकारण करावे अशी संतप्त प्रतिक्रिया मतदारातून उमटत असून. काँग्रेस इंडिया महाविकास आघाडीचे नेते मुस्लिम मतदारासमोर मुजरा करतात, लाचारी पत्करतात, त्यांना मतदारानी गारद करा असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रचार दरम्यान म्हणतात. पण भाजपाची महायुती काय महालाचारी करून महामोदी मुजरा करून सलाम ठोकून मतदारांना मतदान करा म्हणून विनवणी करीत आहेत काय ? याचा खुलासा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी करावा अशी मागणी सर्वसामान्य तरुणात होत असून अमेरिका, रशिया, चीन, पाकिस्तान समोर गोंडा घोळणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महासत्ता सक्षम भारताच्या गप्पा न मारता विश्र्वगुरू बनवून कोणता मठ, पर्वत रांगा हे पक्के करून तेथे मोदी आश्रम सुरू करून संसद भवन मुक्त करावे, अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

## झरोका

एक – घाटकोपर मुंबई फलक प्रकरण, पुणे येथील अग्रवाल पुत्राचे एक्सीडेंट प्रकरण वगैरे सर्व काही चौकशी जामीन अटक करून यातच गुरफटले जात आहे. पुढील ठळक दिशा काही मार्गस्थ होत नाही. यातील गुपित काय ते कळतच नाही. डोकं बधिर झाले.

दुसरा – अरे फलकबाज भिडे आणि बिल्डर अग्रवाल हे राजकीय वरदहस्त असलेले व्यक्ती आणि शक्ती आहे. त्यात तपासणी यंत्रणा तर सरकारच्या भावल्या बनवूनच कार्य करत असतात चौकशीत ताणून करायची गुंतागुंत वाढवायची आणि राजकारण, सरकार धार्जीनीच्या अशा व्यापारी उद्योजकांना मोकळी वाट करून द्यायची. हीच राजकारणी नेत्यांचे सरकारमधील मंत्र्यांचे काम असते. म्हणून सारे तत्पर तपास करीत आहे तू कशाला काळजी करतोस.

एक – आवो खुद उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच कोणी कोणत्या पक्षाच्या कोणा मंत्री संत्री जवळचा असला तरी त्याची काही नाही. गुन्हेगारास शिक्षा झालीच पाहिजे म्हणून पोलिसांना कसून चौकशी करण्याचे आदेश दिल्याने पोलीस आयुक्त स्वतःहून फलक, अपघात वाहन, अपघाताची चौकशी करीत आहे. संबंधित संशयीत आरोपींना अटक केली आहे. मग सदोष मनुष्यवदाचा गुन्हा, त्याबरोबरची इतर कलमानुसार गुन्हा दाखल करून न्यायीक कारवाई का होत नाही म्हणूनच बोलतोय.

दुसरा – अरे लोकसभा निवडणुका, निवडणूक निकाल, त्यात तीन तिरपट विचाराचे महाराष्ट्र सरकार असले तरी शिंदे, फडणवीस, पवार यांच्यात एक वाक्यता नसल्याने निर्णय प्रलंबित होतात. त्यात घाटकोपर मधील फलक कोसळले प्रकरण, पुणे येथील व्यवसायिक अग्रवाल पुत्राचे अपघात प्रकरण त्या दोन्ही घटनांमधील आरोपी राजकारणाशी संबंधित असल्याने पोलीस यंत्रणा होयबा म्हणूनच तपास करीत आहेत. पण ठरवूनच अग्रवाल कुटुंबातील सदस्य वेगवेगळी माहिती देत आहेत तर फलकबाज ठेकेदार कोठडीत असला तरी त्याची बाहेर पडण्याची धडपड सुरू आहे. त्यात ते दोघे यशस्वी होणारच हे लक्षात ठेव.

एक – अहो, मग अपघातातील मृतांच्या नातेवाईकांचे काय?

## काय बोलता राव ?

लोकसभा निवडणुकीचा टप्पा शिल्लक असताना आणि चार जून चा निकाल जाहीर होण्यापूर्वीच भाजप मोदीची महायुती विरोधी काँग्रेस इंडिया महाविकास आघाडीला चक लोकसभा निवडणुकीचा निकाल आमचाच आहे, तुमचा बारदाना हलवा असे सांगत असतानाच, इंडियाची महाविकास आघाडी म्हणते की भाजपा मोदीचे दिवस भरले आहेत. त्यांचे तळ्यातना, मळ्यात आमच्या पडू नका वादात. म्हणून जनतेला सावध करीत असल्याने राजकारणी आणि प्रसार माध्यमात कुतूहल निर्माण झाल्याचे दिसते आहे.

**काय बोलता राव,**

अरे, मतदारांनी कोणत्याही पक्षाला उमेदवाराला मीठ, जोंधळे हाती घेऊन तुम्हालाच मतदान करू, करणार अशी ग्वाही दिली नाही, किंवा कोणताही मुख्य राजकीय पक्ष असो की प्रबळ सत्ताधारी विरोधी नेत्या व्यतिरिक सर्वसाधारण कार्यकर्त्यांनी मन लावून प्रचार केला नाही, केवळ मतदानाचा अधिकार लोकशाही संविधानाची गरज आणि आपणच आपले कैवारी म्हणून जगत असलो तरी नावाला तरी एखादा लोकप्रतिनिधी असावा म्हणूनच मतदान करावे लागते हीच भावना ठेवून मतदारांनी मतदान केले आहे. कोण निवडून येईल हे निकालानंतरच कळेल भाकीत अंदाजावर नाही असेच वाटते मग तुम्हीच काय ते बोला दाजीबा.

## मी समाजात बुद्ध पाहिले

आता मी ८५ वर्षाची आहे.जेव्हा मला तो काळ आठवतो तो म्हणजे जुने कर्मकांड, देव–देवता,प्रथा यांचा त्याग करून देशात नवी ओळख आणि नवी सामाजिक व्यवस्था प्रस्थापित करण्याचा होता.गेल्या ६८ वर्षांत झालेल्या या सर्व सामाजिक बदलांची मी साक्षीदार आहे.त्या काळात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर,संत व समाजसुधारक गाडगे महाराज,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि अनेक समाजसुधारकांना मी पाहू शकले.माझ्या आई –वडिलांनी फक्त जन्म देऊन वाढविले,पण महामानव डॉ. बाबासाहेबांमुळे जीवन जगणे म्हणजे काय,स्वाभिमानाचे जीवन म्हणजे काय,शिक्षण म्हणजे काय या सर्वांचा उलगडा तर झालाच आणि अनुभवायला पण मिळालं.

माझे बालपण गोसे बुजरूक भंडारा ज़िल्हा येथे गेले.मी जेव्हा लहान होते तर मला आठवते कि वडिलांचे घरी धार्मिक वातावरण होते.घरी नेहमी भजन कीर्तन होत असायची.संपूर्ण महार समाज दिवाळीत लक्ष्मीपूजन जन्माष्टमी,गणपती साजरा करत होता.पण त्या काळी आम्ही कुठल्याही हिंदू मंदिरात जात नव्हतो किंवा हनुमान मंदिरातही जात नव्हतो.आमचे गावी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तीनदा कीर्तन झाले, त्या कीर्तनाला माझे वडील,मी आणि महार समाजाचे इतर लोक दुरून ऐकत होतो. त्या काळात साऊंड सिस्टम नव्हती,त्यामुळे कीर्तनात काय सांगितले ते लक्षात नाही,पण माझ्या लक्षात आहे ती मंगलमय नाम तुझे सतत गाऊ दे. मला गाडगे महाराजांचे कीर्तन पण सतत दोन दिवस ऐकण्याचा योग आला.मी जरी अशिक्षित होती,पण माझे विचार नेहमीच सुधारणावादी होते.परिवर्तनवादी विचार हे माझे वडिल दशरथ वानखेडे कडून मिळाले.

त्या वेळी लग्न विधी ४ –५ दिवस चालायचे.माझे लग्न पण जुन्या पद्धतीने झाले. लग्न झाल्यानंतर दरवर्षी देव पुजायला जावे लागायचे.मी धानाला (कुही तालुका) गावावरून कामठी येथे दरवर्षी देव पूजन्या साठी जात होते.गावात कुणालाही ताप–ज्वर आला कि मरीआई,मातामाई यांची पूजा करीत होते.संपूर्ण समाज हा अंधविश्र्वासाने बरबटलेला होता. कान्होबाची पूजा,उपास,देवपूजा,सण साजरे करणे समाजात रूढ होते.

युगपुरुष महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रत्यक्ष पाहण्याचा आणि ऐकण्याचा मला योग आला.भारताच्या स्वातंत्र्य नंतर लगेच १९५४ मधे झालेली लोकसभेची पोटनिवडणूक भंडारा मतदारसंघातून डॉक्टर बाबासाहेबांनी लढवली. त्या वेळेस स्वतःच्या प्रचारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर,डॉक्टर सविता आंबेडकर पवनी ला आले असताना पहिल्यांदा या थोर युगपुरुषाला पहिले.मी त्यावेळेस पंधरा वर्षांची होते. या प्रचार सभेला पंचवीस हजारचे वर लोक उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब म्हणाले कि, मला निवडून द्या, आपले झोपडी चिन्ह लक्षात ठेवा. मतदानानंतर आठ दिवसांनंतर मतमोजणी झाली.काँग्रेस आणि प्रजा सोशालिस्ट पार्टी यांचे कार्यालयात फटाके फुटत होते,लोक पेढे वाटीत होते.हवेत उडणाऱ्या गुलालाने सूर्यप्रकाश पण गुलाबमय झाला होता,पण हजारो वर्षांपासून अंधारात राहिलेल्या वस्त्या आणि तेथे राहणाऱ्या लोकांच्या जीवनातला अंधार अधिक गडद झाला होता. आमची आशा,आमचे भविष्य, आमची प्रेरणा निवडणुकीत हारली होती.बाबासाहेब हरल्यामुळे सर्व खेड्या–पाड्यात तीव्र दुःख झाले.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्वात हिंदू धर्म सोडून बुद्ध धर्माची शिकवण अवलंबली तेव्हापासून आमच्या धानला गावात घर–घरात असलेले देव –दैवत नदीत आणि विहिरीत फेकून दिले.हजारो वर्षांपासून पालन करीत असलेले कर्मकांड,देवपूजा,उपास,लग्नपद्धती एका क्षणात झुगारून टाकले,हि केवढी मोठी वैचारिक व भावनिक बदल,ही इतिहासातील मोठी क्रांतीच होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला बुद्धाचा संदेश मनात खोलवर रुजला होता.आम्ही पहिल्यांदा गौतम बुद्धांचे नाव ऐकत होतो,आम्ही बुद्धाच्या पुतळ्याकडे,त्यांच्या चित्रांकडे खूप कुतूहलाने पाहत होतो आणि इतके सुंदर चित्र पाहण्याची संधी आम्हाला कधीच मिळाली नव्हती.लोकांनी आपले परिधान पद्धती,खानपान, लग्नपद्धती मध्ये बदल केला तसेच मांसाहार खाणे बंद केले.१९५६ अगोदर मुले –मुलींचे नावे मीरा,सीता,जनाबाई, लक्ष्मी,सरस्वती,एकनाथ,रामनाथ,जयराम,श्रीराम,इश्र्वर,सुदाम,दशरथ,रामदास, प्रल्हाद,मारोती, मोतीराम,ढेकल्या,वासुदेव,सखाराम,महादेव,किसन अशी देवी देवतांची नावे ठेवायचे. १९५६ च्या धम्मक्रांतीनंतर कांचन,रमा,संगीता,भिमाई,वंदना,अंजली, राहुल,सिद्धार्थ,मिलिंद,अशोक,भीमराव,धम्मा,कश्यप अशी नावे ठेवण्यात आली. लोकांना स्वाभिमानाने जीवन जगणे कळायला लागले.समाज निळ्या झेंड्या खाली एकत्र येऊन सामाजिक बदलाची चर्चा करायला लागला.आमंत्रणविना कोणाकडेही जेवण बंद केले.आपणही माणसे आहोत व आपला विटाळ मानतात,विहिरीवर पाणी भरू देत नाही,आपला स्पर्श पण वर्ज्य आहे हि भावना लोकांमध्ये तीव्र झाली.हे आपल्या मागील जन्माचे फळ आहे असे समजून घेण्यापेक्षा बंडाची भाषा बोलू लागले. लोकांना आपणही मनुष्य आहोत ही पहिल्यांदा जाणीव होताना मी पाहिलं. नेतृत्वहीन असलेल्या समाजात बुद्ध आणि डॉक्टर बाबासाहेब यांच्या विचाराचे नेतृत्व पुढे आले. लोकगीते,कीर्तन,तमाशे,भजने यांची पण भाषा बदलून समाजपरिवर्तनाची तसेच समाजप्रबोधनाची भाषा बोलू लागले.हि किती मोठी वैचारिक क्रांती होय.

आज मी जेव्हा मागे वळून पाहते तर गेल्या ६८ वर्षा नंतर गावा–गावात खूब सामाजिक बदल झालेत.कुणबी,तेली,माली व इतर समाजाचे लोक आता लग्नामध्ये एकत्र जेवण करतात,आपसातील प्रेमभावना वाढली आहे,एकमेकातील भेदा–भेद फार कमी झालेत. नवी पिढी आंतर–जातीय विवाह व एकमेकाकडे जाणे–येणे,खान–पान स्वीकारत आहे.जातीने दुभंगलेली गावे एकोप्याने नांदत आहेत. हे खऱ्या अर्थाने राष्ट्र प्रगतीचे लक्षण होय. सोडून जाती–पाती माणसांना जोडले,बावीस प्रतीज्ञामुळे,आम्ही देव धर्म सोडले.

**मनोगत : श्रीमती पुष्पा वासनिक**
**-९८९१९०१३१६.**
**शब्दांकन :डॉक्टर कृपाकर वासनिक,नवी दिल्ली**

## कोलकाताच ठरला सर्वोत्तम संघ ; तिसऱ्यांदा जिंकली आयपीएल ट्रॉफी

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या सतराव्या हंगामाची नुकतीच सांगता झाली. रविवारी झालेल्या एकतर्फी अंतिम सामन्यात श्रेयस अय्यरच्या कोलकाता नाईट रायडर्स संघाने पॅट कमिन्सच्या सन राईजर्स हैद्राबादला अवघ्या १० षटकात नमवून तिसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरले. अंतिम सामन्यात पोहचलेले दोन्ही संघ हे तुल्यबळ होते कारण दोघांनीही साखळी सामन्यात चांगली कामगिरी करून पॉईंट टेबलवर पहिले आणि दुसरे स्थान पटकावले होते त्यामुळे अंतिम सामना रंगतदार होणार यात कोणालाही शंका नव्हती. हा सामना रंगतदार होईल आणि क्रिकेट रसिकांना आयपीएलचा थरार अनुभवता येईल अशी अपेक्षा क्रिकेट रसिकांना होती मात्र क्रिकेट प्रेमिंच्या अपेक्षेवर पाणी पडले आणि सामना रंगतदार होण्याऐवजी एकतर्फी झाला. हैद्राबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली तेंव्हा हैद्राबाद संघ धावांचा डोंगर उभारेल किमान दोनशेच्यावर धावा काढेल अशी अपेक्षा क्रिकेट प्रेमींना होती कारण या संघाने याआधी असा पराक्रम अनेकदा केला आहे. आयपीएल मध्ये सर्वाधिक धावांचा विक्रम याच संघाने याच वर्षी केला आहे. त्यांची सलामीची जोडी ट्रेविस हेड आणि अभिषेक शर्मा ही या आयपीएल मधील सर्वात खतरनाक जोडी होती या जोडीने संघाला नेहमीच तडाखेबंद सुरुवात करून दिली त्यामुळे अंतिम सामन्यातही ते अशीच कामगिरी करतील अशी आशा होती मात्र कोलकाताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मिशेल स्टार्क याने पहिल्याच षटकात अभिषेक शर्मा याला बाद केले तर त्याच्या पुढच्या षटकात वैभव आरोराने हैद्राबादचा हुकुमी एक्का ट्रेवीस हेड याला बाद करत हैद्राबादच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. पहिल्या दोन षटकात सलामीची जोडी गारद झाली या धक्क्यातून हैद्राबाद सावरलीच नाही. त्यांचे एका पाठोपाठ एक फलंदाज बाद होत गेले. ज्या संघाकडून दोनशेपेक्षा अधिक धावांची अपेक्षा होती तो संघ कसाबसा शतक पार करू शकला. अवघ्या ११३ धावात हैद्राबादचा संघ तंबूत परतला आणि तिथेच सामन्याचा निकाल काय लागणार हे स्पष्ट झाले. कोलकाताच्या सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. ११४ धावांचे माफक लक्ष घेऊन मैदानात उतरलेल्या कोलकाताने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली. पॉवर प्ले मध्ये म्हणजे पहिल्या सहा षटकात ७२ धावा कुटून कोलकाताने आपला विजय निश्र्चित केला. त्यांच्या वेंकटेश अय्यरने तडाखेबंद नाबाद अर्धशतक झळकावले तर गुरुबाजने ३९ धावांची खेळी केली. कोलकाताने अवघ्या अवघ्या दहा षटकात ११४ धावा काढत आठ विकेट राखून विजय मिळवला आणि तिसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरले आणि आपल्या चाहत्यांना जल्लोष करण्याची संधी निर्माण करून दिली. कोलकाताचा हा विजय सांघिक विजय आहे. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्रारक्षण या तिन्ही आघाडीवर या संघाने अप्रतिम कामगिरी केली. केवळ अंतिम सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत कोलकाताने अप्रतिम कामगिरी केली म्हणूनच हा संघ सुरुवातीपासून शेवट पर्यंत अव्वल क्रमांकावर राहिला. श्रेयस अय्यरनेही संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. या विजयाचे जितके श्रेय या संघातील खेळाडूंना जाते तितके किंबहुना त्याहून अधिक श्रेय या संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरला जाते कारण या विजयामागचा खरा चेहरा जर कोण असेल तर तो गौतम गंभीर आहे. गंभिरला आयपीएल मधील सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक का म्हटले जाते हे त्याने या आयपीएलमध्ये पुन्हा एकदा दाखवून दिले. वास्तविक या वेळच्या कोलकाता संघात दादा म्हणावा असा एकही खेळाडू नव्हता. श्रेयस अय्यर, आंद्रे रसेल, सुनील नारायण वगळता एकही आंतरराष्ट्रीय स्टार खेळाडू या संघात नव्हता. अगदी नवोदित आणि आंतरराष्ट्रीय करियर संपलेल्या खेळाडूंचा हा संघ होता पण म्हणतात ना परिसच्या स्पर्शाने सोने होते तसे या खेळाडूंचे झाले. या संघातही तसा परिस होता तो म्हणजे प्रशिक्षक गौतम गंभीर. कोलकाताला पुन्हा आयपीएल विजेता बनवायचे असेल तर गौतम गंभीर शिवाय पर्याय नाही हे ओळखून कोलकाताच्या संघ मालकाने म्हणजे शाहरुख खानने त्याची संघाच्या प्रशिक्षक पदी निवड केली. गौतम गंभीरने या आधी कर्णधार म्हणून कोलकोताला दोनदा विजितेपद मिळवून दिले आहे आता तो प्रशिक्षक म्हणून संघाला विजेतेपद मिळवून देईल असा ठाम विश्र्वास शाहरुखला होत. गौतम गंभीरनेही संघाला विजेतेपद मिळवून देत हा विश्र्वास सार्थ ठरवला. गौतम गंभीरने प्रशिक्षकपद स्वीकारताच संघातील प्रत्येक खेळाडूला त्याची जबाबदारी समाजवून सांगितली आणि त्यांच्याकडून अपेक्षित ती कामगिरी करून घेतली. सुनील नारायण या लेग स्पिनरला त्याने सलामीला पाठवले आणि त्याला तडाखेबंद फलंदाजीची मुभा दिली. सुनील नारायणने प्रत्येक सामन्यात तडाखेबंद फलंदाजी करून त्याचा विश्र्वास सार्थ ठरवला. फिल साल्ट आणि गुरुबाज यांना त्याच्या सोबत सलामीला पाठवून त्यांच्याकडूनही त्याने चांगली कामगिरी करून घेतली. वेंकटेश अय्यर या आणखी एका तडाखेबंद फलंदाजाला त्याने तिसऱ्या क्रमांकावर पाठवून त्याच्याकडून अपेक्षित कामगिरी करून घेतली. कर्णधार श्रेयस अय्यर यानेही अपक्षे प्रमाणे कामगिरी केली तर रसेल आणि रिंकू सिंगला फिनिशरची भूमिका दिली ती त्यांनी चोख बजावली. गोलंदाजीत स्टार्क, रसेल यांनी वेगवान मारा केला तर वरुण चक्रवर्ती आणि सुनील नारायण ने फिरकीची भार सांभाळला. सर्व खेळाडूंनी त्यांना दिलेली भूमिका चोख बजावली त्यामुळे कोलकाता संघ हे विजेतेपद मिळवू शकले. अर्थात गौतम गंभीरने या खेळाडूंमधील गुणवता हेरली आणि त्यांच्या गुणवत्तेला पैलू पाडून त्यांच्याकडून अपेक्षित कामगिरी करून घेतली आणि कोलकाता संघाला विजयी केले. गंभीरच्या परिस स्पर्शामुळे या खेळाडूंचे सोने झाले आणि हा संघ विजयी झाला. कोलकाताने आपणच आयपीएल मधील सर्वोत्तम संघ आहोत हे दाखवून देत दिमाखात विजय मिळवत आयपीएल ट्रॉफीवर तिसऱ्यांदा स्वतःचे नाव कोरले. विजयी कोलकता नाईट रायडर्स संघाचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार,,दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाचा १० वी निकालाचा उच्चांक

लातूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ,पुणे यांच्या द्वारे शालांत परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.त्यात ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या गेल्या अनेक वर्षांच्या निकालाप्रमाणे याही वर्षी १० वी परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.

लातूर शहरात प्रयोगशील व उपक्रमशीलतेने कार्यरत असणाऱ्या ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात केवळ अभ्यास एके अभ्यास न करता मुलांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात . मुलांचे अनुभव विश्र्व विस्तारित करण्याचे प्रयत्न केले जातात. कला,क्रीडा,संस्कृती, विज्ञान,तंत्रज्ञान तसेच निमंत्रित मान्यवरांच्या भेटी यातून मुलांना आपसूक भविष्यातील संधी आणि आपल्या आवडी जोपासण्याचा मंत्र दिला जातो.

हे सर्व करत १० वी वर्गाचे अभ्यासाचे नियोजन व मार्गदर्शन चालू असते. अनुभवी शिक्षक आणि दुरदृष्टी असणारे संस्थाचालक यांच्या सहवासात मुले ताणमुक्त वातावरणात शिकतात . प्रकल्पात मुलांना अधिक काळ राहून शिकता यावं याकरिता दरवर्षी दोन महिने मुलांसाठी अभ्यासिका असते . इथे त्यांना स्वअभ्यासाची सवय लागते . त्यामुळे शालांत परीक्षेच्या निकालात हे परिणाम दिसून येतात.जाहीर झालेल्या निकालात एकूण ८१ विद्यार्थी संख्येत ४ विद्यार्थ्यांनी १००% गुण घेतले आहेत.यात सार्थक चव्हाण,स्वप्नील चव्हाण,पुष्कर पाटील,व अन्वी इनामदार यांचा समावेश आहे.तर ९०% हुन अधिक गुण घेणारे ५१ विद्यार्थी,तर ८५ ते ९०% गुण घेणाऱ्यांमध्ये ११ विद्यार्थी आहेत. इतर सर्व विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व विद्यार्थी , पालक व शिक्षकांचे प्रकल्पप्रमुख सतीश नरहरे व संचालिका , मुख्याध्यापिका, सविता नरहरे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## नॅशनल पुरस्कार ते साहित्य भूषण पर्यंत अखिलचा प्रवास....

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील अखिल मेश्राम यांना पलपब संस्था गुजरात तर्फे राज्यस्तरीय पुरस्कारांनी सत्कार करण्यात आले आहे.

अखिल मेश्राम यांना नॅशनल एक्सेलन्स पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कारांनी सातारा (कराड) येथे २६ मे रोजी सत्कार करण्यात आले आहे तरी संपूर्ण भंडारा जिल्ह्यात अखिल मेश्राम यांची चर्चा सुरु आहे. एवढ्या कमी वयात स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात,पुस्तका लिहितात,अनेक वृत्तपत्रात अखिल यांचे लेख प्रकाशित होतात. अखिल सर यांना अनेक जिल्ह्यात मार्गदर्शन करण्यासाठी बोलवतात.अखिल सर म्हणतात आयुष्यात अशक्य काहीच नाही.

पुरस्कार दरम्यान अखिल यांनी सांगितले की त्यांना उंच भरारी साठी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने त्यांना बळ मिळते व ते सकारात्मक राहतात. ६ वर्षात कष्ट करून कमी वयात खूप काही करून दाखवीला आणि अनेक गरजू लोकांची मदत करून उच्च पदावर त्यांनी पाठविले आहे. तसेच मोटिवेशनल टिप्स ही पुस्तक यांची महाराष्ट्रात अनेक लोकांना प्रभावित केले असल्यामुळे महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कारांनी सन्मान करण्यात आले आहे. प्रवास १२ वीत सुरु भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्या पासून ते आज पुण्या सारख्या मोठ्या शहरा पर्यंत



न थांबता सुरु आहे. वयाच्या सतराव्या वर्षी अनेक क्षेत्रांचा अनुभव आला आणि इथूनच परिवर्तनाची सुरवात झाली.आत्मविश्र्वास होताच,जिद्द होतीच, चिकाटी होतीच.याच इच्छा शक्तीने २०१७ मध्ये कम्युनिटी अकॅदमी तुमसर येथे सुरु करून व्यक्तिमत्व विकासा बद्दल अनेक विद्यार्थी मित्रांना मार्गदर्शन केलं. बघता बघता २०२२ मध्ये चझडउ कगइ स्पर्धा परीक्षा विद्यार्थी मार्गदर्शन प्लॅटफॉर्म सुरु केलं.तसेच अनेक स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे लेखन केलं आणि लिखाण सुरु आहे.तसेच मार्गदर्शन सुरु आहे. सामाजिक गीतांचा सुद्धा लेखन सुरु आहे.ओळख अशीच बनत नाही कष्ट,जिद्द,चिकाटी,आत्मविश्र्वास आणि सहनशीलता असली पाहिजे.अनेक पुस्तकांचा अथांग वाचन करून एक पुस्तक तयार होतं असते. मोटिवेशनल टिप्स हे फक्त टिप्स नसून योग्य दिशा आणि स्वतः मध्ये बदल घडवणारी पुस्तक आहे.

जिद्दी बना पण ते स्वतः साठी....
चिकाटी ठेवा ते स्वतः साठी.....
विजय मिळवा देशा साठी......
स्वाभिमानी बना देशा साठी.....

**अखिल मेश्राम सर :**
**९५९५९४३९९६**
**९६२३२७२८०४,पुणे.**

## (गुरु वचन) आई-वडिलांना विसरू नका

खूप छान गोष्ट आहे. मुलगा आणि वडिलांच्या नात्याची. हल्ली आई-बाप मुलांना जड झाले आहेत. त्यांना वृद्धाश्रमात धाडले जात आहे. यावरच ही कथा आहे.

एकदा एक वयोवृद्ध बाप आपल्या उच्च शिक्षित मुलासोबत घराच्या छतावरती बसला होता. तेथे एक कावळा आला. मुलाला बापाने विचारले, ते काय आहे? मुलगा म्हणाला कावळा. पुन्हा दुसऱ्यांदा बापाने विचारले, ते काय आहे? मुलाने पुन्हा उत्तर दिले कावळा. तिसऱ्यांदाही बापाने विचारले ते काय आहे? मुलाने जरासे दात-ओठ खात म्हटले, कावळा. मग ते दोघे घरात गेले. त्याला पुन्हा बापाने विचारले ते आत्ता आले होते ते काय होते? मुलाचा संयम सुटला होता त्याने ओरडत सांगितले, समजत नाही का? कावळा...... कावळा... कावळा. पाचव्यांदा बापाने विचारले ते आपण पाहिले ते काय होते? मुलगा आता मात्र जाम भडकला त्याने त्यांना सांगितले, का टाईम पास करताय? तुम्हाला कितीदा सांगितले तो कावळा होता म्हणून, तरी तुम्हाला समजत नाही का? का जाणून- बुजून त्रास देताय?

मग त्या वयोवृद्ध बापाने त्या मुलाला घरातील एक डायरी आणायला सांगितली. त्याने ती आणली, त्यात हीच कथा लिहिली होती. परंतु, ती थोडी वेगळी होती. त्या बापाच्या जागी एक लहान मुलगा होता. त्याने बापाला एक-दोन नाही तर तब्बल २५ वेळा हाच प्रश्न केला होता, आणि तितक्याच वेळा त्याच्या वडिलांनी त्याच्या प्रश्नाला हसत हसत उत्तर दिले. त्यांना त्याच्या विचारण्याचा मुळीच राग येत नव्हता, उलट त्यांना त्या मुलाचा निरागस स्वभाव आणि त्याचे ते विचारणे आवडत होते.

तो बाप त्या मुलाचाच होता जो त्याला केवळ पाच वेळा विचारल्यावर त्यांच्यावर खेकसला. फरक फक्त हाच, की मुलासाठी बापाने केलेले कष्ट, त्यांनी सहन केलेल्या सर्व वेदना तो विसरला होता. उलट त्याने वडिलांना केवळ दुःखच दिले. लक्षात ठेवा. तुमच्या आई-वडिलांनी तुमच्यासाठी कितीतरी कष्ट केले आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी केवळ दुःखच देत आहात? आई-वडिलांना विसरू नका. त्यांनी केलेल्या कष्टांना विसरू नका.

## उपदेशकथा
## चित्रकाराचा सन्मान

भोजराजाच्या आश्रयाला अनेक नाट्य कलाकार, संगीततज्ज्ञ, शिल्पकार, चित्रकार येत असतात. तो त्यांचा यथोचित आदर करी नि भरपूर धन देऊन सन्मानाने परत पाठवी. चित्रकार शिवशर्मा एकदा शेषनागाने एक अप्रतिम चित्र तयार केले. नंतर स्वतः ते चित्र राजदरबारात आणून राजाला भेट म्हणून त्याने अर्पण केले. 'वा! फारच छान आहे चित्र आहे हे आपले.' राजा कौतुकाने म्हणाला व आपल्या पद्धतीप्रमाणे दहा हजार मोहोरांची देणगीही जाहीर केली. पण शिवशर्मा केवळ चित्रकारच नव्हता. तो उत्तम कवीसुद्धा होता. चटकन तो बोलून गेला, 'महाराज, बेडकांना भक्षण करणारे नाग जागोजागी दिसतात. पण पृथ्वीचा भार सोसणारा एक शेषनागच बरं.' शेषनागाच्या उदाहरणातून सर्वांना आश्रय देणाऱ्या भोजराजाची त्याने केलेली ती स्तुती आणि त्याचबरोबर गोरगरीबांना पिळणाऱ्यांची केलेली निंदा चतुर राजाच्या लक्षात आल्यावाचून कशी राहील? संतुष्ट होऊन आणखी पंचवीस हजार मोहोरा त्याने शिवशर्माला दिल्या. राजदरबारातल्या इतर काही चित्रकारांना ही गोष्ट अर्थातच रुचली नाही. त्यांना त्यांच्या चित्रांबद्दल एवढे मोठे बक्षीस कदापि मिळाले नव्हते. राजाला त्यांच्या चेहऱ्याची नाराजी चटकन समजली व तो म्हणाला, 'मित्रांनो, चित्रकला नि काव्यकला यांचा अजोड संगम झालाय शिवशर्मात. दुग्धशर्करायोग. मणिकांचन योग म्हणतात तो यालाच बरे!' इतर चित्रकारांनीही मग शिवशर्माचा मोठेपणा मान्य केला आणि भोजनाच्या दरबारात आणखी एक नवरत्नाची भर पडली.

कथा उपदेश : अंगात गुण असले की कधी कधी तरी त्याचे चीज होते.

# सिमला मिरची आहे आरोग्याचा खजिना; जाणून घ्या काय आहेत आरोग्यदायी फायदे...

हिरव्या भाज्यांमध्ये सिमला मिरचीचा देखिल समावेश होतो. सिमला मिरचीची लागवड जगभरात केली जाते. सामान्य भाषेत याला मिरची म्हणजेच सिमला मिरची म्हणतात. ढोबळी मिरची असंही म्हटलं जातं. सिमला मिरचीचा वापर सर्व प्रकारच्या पदार्थांमध्ये केला जातो. हिरवी सिमला मिरची आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जाते. हिरव्या सिमला मिरचीबरोबर लाल अणि पिवळी सिमला मिरचीही मिळते. सर्व प्रकारच्या सिमला मिरची पौष्टिकतेने परिपूर्ण आहेत. पण हिरवी सिमला मिरची इतर सर्व सिमला मिरचीपेक्षा जास्त फायदेशीर मानली जाते. हिरव्या सिमला मिरचीमध्ये अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. हिरवी सिमला मिरची खाण्याचे अनेक फायदे आहेत.




पोषणाचा खजिना : हिरव्या सिमला मिरचीला पोषक घटकांचा खजिना म्हणतात. त्यात कॅलरी, प्रथिने, कार्बोहायड्रेट, फायबर, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, पोटॅशियम आणि पायरीडॉक्सिन सारखे घटक मुबलक प्रमाणात असतात.

आतड्यांसाठी उत्तम मिरची : हिरव्या सिमला मिरचीचे सेवन आतड्यांसाठी खूप फायदेशीर आहे. हिरव्या सिमला मिरचीमध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असते. जे खाल्ल्याने शरीराची पचनक्रिया मजबूत होते आणि आतड्यांमध्ये कॅन्सर सारख्या आजाराचा धोका राहत नाही.

अँटिऑक्सिडंटसने समृद्ध : हिरव्या सिमला मिरचीमध्ये लाल आणि पिवळ्या सिमला मिरचीपेक्षा जास्त अँटी-ऑक्सिडंट घटक असतात. हिरवी सिमला मिरची हा व्हिटॅमिन सीचा उत्तम स्त्रोत देखील मानला जातो. अशा परिस्थितीत हिरवी सिमला मिरची खाल्ल्याने उच्च रक्तदाब, कर्करोग आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

हृदय आणि डोळे निरोगी राहतील : हिरव्या सिमला मिरचीच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल, रक्तातील साखरेची पातळी आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो. त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. त्याचबरोबर हिरव्या सिमला मिरचीमध्ये असलेले ल्युटीन नावाचे घटक देखील डोळ्यांची दृष्टी वाढवण्यास मदत करतात.

वजन कमी करण्यात मदत : शरीराचे वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी दैनंदिन आहारात सिमला मिरचीचे सेवन उत्तम ठरू शकते. सिमला मिरची फायबर समृद्ध तसंच कमी चरबीयुक्त अन्न आहे. ज्याच्या सेवनाने लठ्ठपणा कमी होतो आणि पोटाची चरबीही नाहीशी होते.

# चोरी साठी चोर अशी निवडतात घरे

घरफोड्या हा जगात सर्वठिकाणी होणारा प्रकार. घरफोडी झाली नाही असे एखादे गाव सुद्धा सापडणार नाही. चोर कुठल्या घरात डल्ला मारायचा हे कसे ठरवितात असा प्रश्न अनेकांना पडत असेल. हाच प्रश्न संशोधकांच्या मनात सुद्धा येत असणार. त्यामुळेच जगातील या प्रकारचे पहिले संशोधन किंवा अभ्यास बेल्जियमच्या घेन्त विद्यापीठाचे प्रोफेसर कुरालार्सन आणि मद्रास विद्यापीठाच्या डॉ. प्रियंवदा यांनी केला असून त्याचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

प्रत्येकाचे घराचे जसे काही स्वप्न असते तसेच घराच्या दरवाज्यावर आकर्षक नेमप्लेट लावण्यास सुद्धा महत्व दिले जाते. वरील दोघा संशोधकांनी केलेल्या संशोधनात आकर्षक नेमप्लेट चोरांचे लक्ष वेधून घेण्यात महत्वाच्या ठरतात. चांगली घरे, आकर्षक नेमप्लेट, दारात उभ्या असलेल्या महागड्या गाड्या, सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही या साऱ्याची नोंद चोर घरफोडी करण्यासाठी घेतात आणि मग सणवार, विवाह समारंभ असे योग साधून घरफोड्या करतात. कारण या दिवसात रोकड आणि दागदागिने घरात आणून ठेवले जात असतात. प्रियंवदा आणि कुरालार्सन यांनी ३१४ चोरावर असा अभ्यास करून ३०० पानी रिपोर्ट सादर केला आहे.

यानुसार ६३ टक्के चोरऱ्या नेमप्लेटवर लिहिलेले प्रोफेशन वाचून होतात, ७० टक्के घरफोड्या चोर त्यांच्याच घराच्या परिसरात करतात कारण तेथील गल्ली बोळ, रस्त्यांची त्यांना चांगली माहिती असते, ७२ टक्के घरफोड्या दारातील गाड्या पाहून होतात. ९७ टक्के चोर घरफोडीसाठी अनेक दारे किंवा बाहेर जाण्याचे मार्ग असलेली घरे निवडतात. गल्लीबोळातील घरे किंवा रस्ता जेथे संपतो म्हणजे डेडएंड असलेली घरे चोर टाळतात.



चोर चोऱ्या करताना पोलीस गस्तीच्या वेळा लक्षात घेतात, चोरी नंतर पकडले जाऊ नये म्हणून सार्वजनिक वाहनाचा वापर करतात, ज्यामुळे नाकाबंदी मधून त्यांची सुटका होते.

घरासमोर वर्तमानपत्राचा ढीग असले, दुधाच्या पिशव्या पडलेल्या असतील तर घरात कुणी नाही हे अपोआप कळते. घराच्या मागच्या दारातून आत प्रवेश करण्यास चोरांची पसंती असते. कुत्री असतील तर त्यांना खायचे पदार्थ देण्याकडे चोरांचा कल असतो. कुलुपे तोडायला चोरांना फारतर १० सेकंद लागतात आणि घरात शिरताच ते प्रथम बेडरूम, देवघर आणि किचन मध्ये शोध घेतात. चोऱ्यांचे ॲडव्हांस तंत्र चोर तुरुंगातूनच शिकतात असेही या संशोधनात दिसून आले आहे.

# शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

मी काही प्राध्यापक,राजकिय विश्र्लेषण तज्ञ नाही. पण मी १९८२ पासुन असंघटीत नाका कामगारांना संघटित करून त्यांना न्याय हक्क अधिकार आणि प्रतिष्ठा मिळवुन देण्यासाठी सत्यशोधक कामगार संघटनेच्या बॅनर खाली काम करत आलो आहे.१९९४ पासुन पत्रकारिता,पत्रकार,स्तंभ लेखन,साहित्यिक,कामगार नेता म्हणून वैचारिक लेखन सुध्दा करीत आहे.म्हणून मला सध्याच्या परिस्थितीचे गांभीर्य जाणवते.ते मी राज्यातील साठ वृतपत्रात नियमितपणे लेख लिहून मांडत असतो.

रोजगार नसेल तर पैसे कुठून मिळणार.पैसे नसणार तर अन्न धान्य कुठून मिळणार मग चूल पेटली नाही तर पोटात अन्न कसे जाईल.अशी ही पोटाची भूक आणि आग देवा धर्माच्या पूजा अर्चा करून मंत्राने शांत होत नाही. देवा धर्माच्या नांवाने विशिष्ट समाजाचे पोट भरते. त्यांना तुमच्या पोटाच्या भुकीचे व आगीचे काही घेणे देणे नसते आणि नाही. तुम्ही वाचले असेलच कि शेजारच्या श्रीलंका देशात काय घडले. तेथेही धार्मिकतेचा कहर झाला होता.शेवटी पोटाच्या भुक आणि आगी पुढे राष्ट्र कोसळले. आणी धार्मिकतेतुन लगेचच मुक्त होवून सावरले. आज ते आपल्या देशाच्या पुढे पण गेले आहे.जगातील मुस्लिम धार्मिक राष्ट्रांची काय परिस्थिती आहे तुम्ही जाणतच असालच.हे आपल्याकडे घडू नये म्हणून आर एस एस प्रणित भाजपाने दहा वर्षांत जे घडविले त्यातुन देशाला वाचायचे असेल तर मोदीची हुकुमशाही घालवायला हवी. एकेकाळची चीनशी स्पर्धा करणारी आर्थिक व्यवस्था आज जगात शेवटून तिसरी आहे. कारण मोदी सरकारने रोजगार निर्मिती कडे लक्ष न देता.रोजगारनिर्मिती करणाऱ्या सरकारच्या सार्वजनिक कंपन्या खाजगी भांडवलदारांना कवडी मोलाने विकल्या. कायमस्वरूपी सुरक्षित रोजगार देणाऱ्या कंपन्यांत कंत्राटी कामगार पद्धतीने कष्टकरी कामगारांना कायम असंघटीत कामगार बनवुन ठेवले.या विरोधात न्यायालयात न्याय मागण्याचा अधिकार सुध्दा हिरावून घेतले. दुसरी कडे मंदिराला प्राधान्य देण्यात आले.सर्व आर्थिक व्यवस्था मंदिरा भवती फिरवली. त्यामुळेच मंदिर त्याच्या जागी आणी आपले पोट आपल्या जागी आहे.ज्याच्या कडे मंदिर व्यवस्था आहे त्याच्याकडे अमाप पैसा येतोय.पण असंघटीत कष्टकरी मजुरांचे गरिबांचे काय ? त्यांचे श्रमशोषण करणारी मनुवादी मानसीकता असलेली



दरी वाढत चालली आहे.

असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी मजुरांना हक्काची मजुरी देण्या ऐवजी नाईलाजास्तव मोफत धान्य दिले जाते.आरोग्य सेवेची जाहिरात केली जाते. नाहीतर गजब होईल. कंत्राटी मजुरांना हे मोफतचे धान्य दिले नाही तर मिळणाऱ्या सात हजार ते पंधरा हजारात त्याचे कुटुंब उपासी राहून मेल्या शिवाय राहणार नाही. म्हणूनच शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.भारत देशावर हजार वर्ष मुसलमानांनी राज्य केले. पण आजही ८० टक्के जनता मागासवर्गीय हिन्दु आहेत. व १४ टक्के मुसलमान आहेत.ही आकडेवारी मोदी सरकारचीच आहे. हे १४ टक्के मुसलमान ८० टक्के हिन्दु लोकांवर कसा काय अन्याय करू शकतील ? उगाच हिंदू खातरे मे सांगुन जाती जातीत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा भुल थापांना बळी पडू नका.शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.त्यासाठी लक्षात ठेवा आपल्या खांद्यावर आपलेच डोके आहे. ते विचार करण्यासाठीच वापरले पाहिजे आहे.येणाऱ्या काळात कोणाचा बळी कोणाच्या चुकीमुळे जाईल हे सांगता येत नाही.जाहिरात करणारे भव्य अवाढव्य होडिंग हवेमुळे पडले.त्याला कोण दोषी आहे?. सर्वच यंत्रणा एकमेका कडे बोट दाखवते. मग बळी गेलेल्या आणि जखमी झालेल्या माणसांच्या नुकसान भरपाईचे काय?. मुख्यमंत्री कुठेही कसाही अपघात झाला तर पाच लाख रुपये देण्याची घोषणा करतात.त्यांची खरच अंमलबजावणी होते काय?.शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

पुण्यात एक श्रीमंत बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने गाडीने दोन अभियंत्यांचा बळी घेतला. मुंबईत एक श्रीमंतांच्या अल्पवयीन मुलाने मोटर बाईक ने रस्त्याने जाणाऱ्या निरपराध माणसाचा बळी घेतला. तसे कष्टकरी मजुरांचा इमारत बांधकाम करतांना किती बळी जातात त्यांची नोंदच होत नाही. या सर्व माणसांच्या बळी जाण्याला आपण किंवा सरकार जबाबदार नाही काय?.शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

सरकारी यंत्रणा चलविणारे मानसचं आहेत. त्यांना कायद्याची भीती वाटत नाही. प्रत्येक कामासाठी नियम कायदे कलम आहेत.पण स्वार्थीपणामुळे सरकारी नोकरी म्हणजे टेबल खालून पैसे खाणे हाच जन्मसिद्ध अधिकार समजला जातो.त्यात बळी घेणारा कोण्या जाती धर्माचा व पक्षाचा आहे त्यावर गुन्हा ठरविला जातो. काही दिवस गुन्हा दाखल केला जात नाही. बळी जाणार कोणत्या जाती धर्माचा आहे. तो त्यांचा समाज काय करू शकतो याचा अंदाज घेतल्या जातो. हे आपण गेल्या दहा वर्षात सर्वच चौकटी मोडून हुकुमशाही पद्धतीने कामकाज कसे चालते पहिले असेलच. येणाऱ्या काळात निवडणुकीत सरकारी कर्मचारी अधिकारी याने कर्तव्यदक्ष पणे काम केले नाही.तर ई व्ही एम मशीन शेपन्न इंच छाती असणाऱ्या आदरणीय मोदी शेट यांना हवा तसा निकाल दिला जाईल. आपण काहीच करू शकणार नाही.म्हणून भविष्यात जगण्यासाठी शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.वाचा आणि शांत रहा. पण जगण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवा. कारण मागीतल्याने मिळत नाही आणि संघर्षा शिवाय पर्याय नाही.म्हणूनच शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**

## इतिहासात आजचा दिवस

अंतरराष्ट्रीय

१८४५ - क्युबेक कॅनडा येथे आगीत १५०० घरे जळून खाक.

१९१२ - ऑस्ट्रेलियाचा फिरकी गोलंदाज जॅकी मैथ्युसने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकच दिवशी दोन हॅटट्रीक घेतली.

१९७७ - केनटक्की येथे बेवरली हिल्स सप्पर कल्बमध्ये लागलेल्या आगीत १६५ जण ठार.

१९९५ - रशिया येथे खबरावोस्क शहरात भूकंपाने २००० जण ठार.

राष्ट्रीय

१९६३ - बंगालच्या खाडीत मोठ्या वादळाने २२००० ठार.

१९६५ - धनबादच्या ढोरी खाणात स्फोट; ४०० ठार.

१९९६ - भारताचा पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा राजीनामा.

२००६ - उत्तर प्रदेशात माजी खासदार डी.पी. यादव यांच्या समर्थनार्थ जिल्हा परिषद,पंचायत समिती आणि ग्राम पंचायतींच्या दोनशेपेक्षा जास्त सदस्यांनी आपल्या हजारो समर्थकांसह बहुजन समाज पार्टीचा राजीनामा दिला.

२००८ - बिहारमधील जलद न्यायालयाने एका हत्या प्रकरणात एकाच कुटुंबातील चार महिलांसह आठ जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

जन्म

१८८३ - स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, भारतीय क्रांतिकारक, प्रभावी वक्ते, मराठी साहित्यिकाचा जन्म.

१९०३ - शंतनुराव किर्लोस्कर, मराठी उद्योगपतीचा जन्म.

१९२३ - एन. टी. रामाराव, लोकप्रिय तेलुगू अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक, आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्रीचा जन्म.

निधन

१२५९ - डेनमार्कचे राजा क्रीस्टोफेल पहिला यांचे निधन.

१९६१ - प. कृ. गोडे, प्राच्यविद्या संशोधकाचे निधन.

१९९० - मलेशियाचे पहिले पंतप्रधान हुसैन बीन औन यांचे निधन.

२००८ - ग्रॅड स्लॅम विजेता स्वीडनचा पहिला खेळाडू आणि आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेमचे सदस्य स्वेन डेव्हिडसन यांचे निधन.

## त्यांच्या वाणीतून....

माझे निलंबन हे माझ्या विरुद्ध तक्रारीमध्ये तथ्य नसतानाही त्रास देण्याच्या हेतूने आणि माझे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी मा. मंत्री महोदय यांच्या दबावामुळे केलेले आहे, अशी माझी धारणा आहे. झालेल्या निलंबनामुळे माझे मनोधैर्य खचून गेले असून माझे कुटुंब मानसिक तणावामध्ये आहे. निलंबन करत असताना, माझ्या सध्याच्या कार्यात तक्रारी नसताना केवळ जुन्या तक्रारी शोधून काढून आणि माझे म्हणणे सादर करण्याची कोणतीही संधी न देता माझे निलंबन करुन माझ्यावर अन्याय झालेला आहे.

- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार

## राशी भविष्य २८ मे २०२४

मेष : शुभ रंग: निळा, शुभ दिशा:दक्षिण

कमी प्रयत्नात भरपूर फायदा होण्याची शक्यता. आपल्या अपेक्षेप्रमाणे आपल्याला मान सन्मान मिळणार आहे. मनात योजल्या प्रमाणे कामे सुरळीत पार पडतील. जीवनसाथीचे सहकार्य मिळेल. कोणतेही काम विचार पूर्वक करा.

वृषभ : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:उत्तर

स्वत:च्या प्रयत्नांनी समाजात प्रतिष्ठा आणि मान सन्मान मिळेल. व्यापारात आर्थिक लाभ होण्याची शक्यता. पुढील योजना आमलात आणण्यासाठी सुरूवात करा. पैशाची अडचण राहणार आहे.

मिथुन : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पूरब

स्वत:च्या निर्णयात क़ायम रहा. पारिवारिक समाधान मिळेल. अडकून पडलेली कामे सुरळीत पार पडतील. प्रकृतीची काळजी घ्या.व्यापार सुरळीत चालेल.

कर्क : शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पश्चिम

अडकलेले पैसे मिळाल्याने आनंदीत व्हाल.कौटुंबिक मतभेत समाप्त होतील. नवीन योजनांमध्ये फायदा होण्याची शक्यता. जबाबदारीने कामे पार पाडा.

सिंह : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा:पूरब

मानसिक दृष्ट्या उत्साहित रहाल. मुलांच्या कार्यामुळे आनंदीत रहाल. प्रयत्न केला असता येणारे पैसे परत मिळतील. व्यावाहारिक संबंध सुधारतील. प्रतिस्पर्ध्याकडून सावध रहा.

कन्या : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:उत्तर

जमीनीचे व्यवहार करण्याचा बेत आखाल. नौकरीमध्ये हाताखालच्या लोकांचे सहकार्य लाभेल. मुलांच्या कामावर लक्ष ठेवा. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण करा.

तुळ : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:पश्चिम

सामाजिक कार्यात सक्रियतेने भाग घ्याल. मुलाच्या शिक्षणाकडे लक्ष द्या. व्यापार सुरळीत चालेल. वाईट व्यसनांवर नियंत्रण ठेवा.

वृश्चिक : शुभ रंग : नीळा, शुभ दिशा:दक्षिण

सहजासहजी सफलता मिळेल. योजनेनुसारच आपले कामे मार्गी लागतील. दुसऱ्याची निंदा करू नका. पारिवारीक सुख आणि शांती मिळेल.

धनु : शुभ रंग : केशरी, शुभ दिशा:उत्तर

बुद्धीमत्तेच्या जोरावर व्यवसायात यश संपदाल. परीवाराशी संबध दृढ होतील. ईश्वराविषयी आस्था वाढेल. व्यक्तीगत समस्या दूर होतील.क़ायदेशीर कामे सुरळीत पार पडतील.

मकर : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:पूरब

विरोधकांना आपल्या कामापासून प्रभाविकत करू शकता. व्यवसायात दुर्लक्षपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. परिवाराशी मिसळून रहा. परिस्थिती पाहून निर्णय घ्या.

कुंभ : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:दक्षिण

मेहनत आणि धावपळीमळे कामत यश मिळण्याची शक्यता आहे. चालू घडामोडीचा फायदा घ्या. आपल्या सहचरणीचा सल्ला घ्या. व्यापारात मनासारखे घडेल.

मीन : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम

मानसिक अस्वस्थेमुळे आपल्या कामात अडचणी येण्याचा संभव आहे. आपल्या योजना दुसऱ्याला सांगून फसगत करू नका. व्यापार व्यवसाय मध्यम. प्रवास करू नका.

२८ मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, शनि, सूर्य व बुधाचा प्रभाव आहे. तुमची आकलनशक्ती सूक्ष्म आहे. कुठल्याही समस्येचा तुम्ही मुळापर्यंत जाऊन शोध घेता. तुमचा उत्साह प्रचंड असतो तसेच तुमचे निर्णय दूरदर्शीपणाने घेतलेले असतात. एकदा ध्येय ठरल्यावर सातत्य व चिकाटीने तुम्ही त्याचा पाठपुरवा करता. तुम्ही मनाने दिलदार व उदार अंत:करणाचे आहात. भ्रष्टाचार नीतिमूल्यांचा अनादर तुम्हाला खपत नाही. समाजात काही आदर्श प्रस्थापित करण्यासाठी तुमची खटपट चालते.

आपल्या अस्मितेचे रूपांतर गर्विष्ठपणात होऊ देऊ नका. वास्तवात उतरवता येतील. असेच आदर्श जपा. नाहीतर अव्यवहारी म्हणून तुमची संभावना होईल. मनावरील ताणामुळे उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा धोका आहे.

## लातूरच्या श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के

लातूर : येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. मागच्या सलग १३ वर्षांपासून विद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

संस्थेच्या वतीने दहावी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा कस्तुर- कंचन सभागृहात संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, सहसचिव सुभाष कासले, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सौ. सुनिता जाधव, राहुल पांचाळ आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. विद्यालयाची विद्यार्थीनी कु. साक्षी सूर्यकांत माने हिने १०० टक्के गुण मिळवून विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला. कु. दर्शना विठ्ठल रोंगे हिने ९९. ८० टक्के गुण मिळवून सर्वद्वितीय तर श्रीसंत चंदर भुतेवाड व कु. तनुजा नेताजी भोईबार या दोघांनी ९९. ४० टक्के गुण मिळवून सर्वतृतीय येण्याचा मान मिळवला.

दहावीच्या परिक्षेस विद्यालयातून एकूण १६० विद्यार्थी बसले होते . ते सर्वच्या सर्व विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. एकूण १६० विद्यार्थ्यांपैकी ८१ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. ५७ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८९. ९ टक्के, १६ विद्यार्थ्यांनी ६० ते ७४. ९ टक्के तर ६ विद्यार्थ्यांनी ४५ ते ५९. ९ टक्के गुण मिळवले आहेत. विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी मराठी विषयात ९८ गुण मिळविले आहेत. १७ विद्यार्थ्यांनी संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.पाच विद्यार्थ्यांनी इंग्रजीत ९६, तीन विद्यार्थ्यांनी गणितात ९९, दोन विद्यार्थ्यांनी विज्ञानामध्ये १०० तर एका विद्यार्थ्याने इतिहास भूगोलमध्ये १०० गुण मिळविले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सौ. सुनिता जाधव, राहुल पांचाळ, सौ. तनुजा देशपांडे, सौ. भोसले, वसुदेव जाधव, मनोज मुंदडा, मधुकर काळे, माने या अध्यापकांचाही संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश सर्वांच्या परिश्रमाचे असून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यासाचे अत्युच्च शिखर गाठण्यासाठी शिक्षणात चांगले यश मिळवावे. त्यासाठी मोबाईलचा वापर केवळ अभ्यासासाठीच करावा, अवांतर बाबींसाठी मोबाईलचा उपयोग करू नये असे सांगितले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेला अभिमान वाटतो,असे सांगून त्यांनी भावी आयुष्यासाठी, उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तनुजा देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन गिरीश कुलकर्णी यांनी केले. यासास्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, सहसचिव सुभाष कासले , कोषाध्यक्ष जयेश बजाज, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांसह सर्व शिक्षक - शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही अभिनंदन केले आहे.

श्री त्रिपुरा रिलायन्स लातूर पॅटर्न चे १२ बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

लातूर / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक बोर्ड लातूर अंतर्गत घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा श्री संगमेश्र्वर चारीटेबल ट्रस्ट लातूर संचालित श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचा निकाल ९९.५६% लागला आहे. यात दिक्षित ऋत्विज हा विद्यार्थी ९३.३०% गुण घेऊन संस्थेतून प्रथम आला आहे. तसेच, तोडकरी सिद्धी - ९२.००% व्दितीय , सगर पल्लवी - ९०.८३ % तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच नाईक हफसा - ९०.६६ % , शेगावकर समर्थ - ९०.५०%, शेटे संस्कार - ९०.१६ %, उप्पे तन्वी - ९०. ०० % विद्यार्थ्यांनी ९० % पेक्षा अधिक गुण मिळवून यश संपादन केले आहे.

तसेच इंग्रजी विषयामध्ये - कबाडे वैष्णवी (९७), कांबळे वैष्णवी (९७), जीवशास्त्र विषयात - शेगावकर समर्थ (९८), शेटे संस्कार (९६), शेख हाफिजा (९५), गणित विषयात - मगर तुषार (९७), पिक शास्त्र विषयात - शेख हापिजा (१९९) गुण संपादित केले आहेत.

इ. १० वी मध्ये गुणवत्ता पूर्ण व साधारण गुण असणाऱ्या अश्या सर्व प्रकारच्या मुलांमधून असाधारण निकाल देण्याचे कार्य संस्था मागील २१ वर्षांपासून यश्र्वस्वीरित्या करत आहे. त्याचेच द्योतक म्हणजे १२ वी

# लातूर मनपाची नालेसफाई मोहीम ६ मोठे व ४० छोट्या नाल्यांची स्वच्छता ७ जून पर्यंत पूर्ण होणार स्वच्छतेचे काम







लातूर/ प्रतिनिधी: पावसाळ्याच्या तोंडावर लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून मान्सूनपूर्व नाले सफाई मोहीम हाती घेण्यात आली आहे.या अंतर्गत आतापर्यंत ६ मोठे व ४० छोट्या नाल्यांची स्वच्छता करण्यात आली असून दिनांक ७ जून पूर्वी स्वच्छतेचे काम पूर्ण केले जाणार आहे.

लातूर शहरात एकूण ११५ नाले आहेत. त्यात ५० मोठ्या व ६५ छोट्या नाल्यांचा समावेश आहे. पावसाळ्याच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दि.२ मे रोजी बैठक घेवून ७ जुनपूर्वी नालेसफाई करण्याच्या सुचना केल्या होत्या.त्यानुसार दि.१० मे पासूनच या नाल्यांची स्वच्छता करण्याची मोहीम पालिकेने हाती घेतली आहे.त्यासाठी २ मोठे जेसीबी ६ छोटे जेसीबी,४ टिप्पर व १० ट्रॅक्टरचा वापर करण्यात येत आहे.गतवर्षी पालिकेने नालेसफाई करून २५० टन घनकचरा संकलित केला होता.यंदाही त्याच पद्धतीने काम सुरू आहे.

शहरातील इस्लामपुरा, गंगाधाम,रिंग रोड,हलकुडे नगर, दीप ज्योती नगर, नांदगाव वेस, साईबाबा नगर,संविधान चौक,कव्हा रोड,कातपुर रोड,नांदेड रोड,सारोळा रोड,बरकत नगर,काझी मोहल्ला, साईधाम रोड,गोपाळ नगर, शंकरपूरम, दयानंद महाविद्यालय, प्रकाश नगर या भागातील नाल्यांची सफाई जेसीबीच्या सहाय्याने करण्यात आली आहे.उर्वरित सर्व लहान मोठ्या नाल्यांची स्वच्छता दि.७ जून पूर्वी करण्यात येणार असल्याची माहिती मनपा उपायुक्त शुभम क्यातमवार यांनी दिली.

# एच. एस. सी. बोर्ड परीक्षेत दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखत उत्तुंग भरारी*

लातूर. एच एस सी बोर्ड परीक्षा २०२४ च्या निकालामध्ये दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एका मानाचा तुरा खोवलाआहे. कु. पद्मजा व्यंकट फरकांडे व कु. श्रद्धा सुशील कुमार निनगुरकर या विद्यार्थिनीने ९७. ८३ गुण घेऊन महाविद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा सन्मान मिळविला आहे. तर चि. प्रथमेश बस्वराज अंबुलगे या विद्यार्थ्यांने ९६.६७% गुण घेऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

तसेच कु.गौरी देविदास वायकोस व कु. प्रियंका संतोष मोरे या विद्यार्थिनींनी ९६.५०% गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.९५% पेक्षा जास्त




घेणारे ०८ विद्यार्थी, ९०% पेक्षा जास्त घेणारे ३९विद्यार्थी, ८५ % पेक्षा जास्त गुण घेणारे ६७ विद्यार्थी तसेच ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे १४८, प्रथम श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी २९८. एच .एस.सी. बोर्ड लातूर विभाग ९२.३१% तर महाविद्यालयाचा निकाल ९६.२६% आहे.विविध विषयात पैकीच्या पैकी गुण घेणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे:-

संस्कृत १, आयटी २,एस. आय.एस.ई.१८, बँकिंग १०, अकाउंटन्सी ५, वाणिज्य संघटन व व्यवस्थापन ३, गणित १, तर अर्थशास्त्रात ९९ गुण घेणारे ७ व सचिवाची कार्यपद्धती ९९ गुण घेणारे २ विद्यार्थी, इंग्लिश विषयात ९३ गुण घेणारे ०२ विद्यार्थी, मराठी या विषयात ९५ गुण घेणारे ०२ विद्यार्थी हिंदी या विषयात ९५ घेणारा ०१ विद्यार्थी, सहकार विषयात ९० गुण घेणारा ०१ विद्यार्थी. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्था अध्यक्ष श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष श्री रमेश कुमार राठी ,श्री अरविंद सोनवणे व श्री ललीतभाई शहा, सचिव श्री रमेश जी बियाणी , कोषाध्यक्ष श्री संजय जी बोरा, प्राचार्य डॉ .राजाराम पवार, पर्यवेक्षिका डॉ. अंजली बुरांडे कोरे, समन्वयक प्रा. सुभाष मोरे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा,पण संघ कुठे आहे ?

जगात स्वार्थ पायी माणस आत्मकेंद्रित झाली आहेत.एकत्र मातृसंस्था संस्कृती नष्ट झाली आहे. एकत्र कुटुंब पद्धत विभक्त पद्धतीत झपाट्याने बदलत आहे.अन्याय, अत्याचार करून शोषणाच्या पद्धतीत सुद्धा स्मार्टचोरी मोठ्या प्रमाणत होत आहे. त्यामुळेच कोण कोणाचे रक्षण करण्याच्या भांडगडीत पडतांना दिसत नाही.म्हणूनच निसर्ग नियमाने माणसांनी संघटीत राहिले पाहिजे.संघटीत झाल्यावर कोणीच अन्याय अत्याचार आणि शोषण करतांना शंभर वेळा विचार करेल.त्यांचा कधी पराभव होत नाही असे तथागत बुद्धांनी वज्जी समाजाचे उदाहरणे देऊन बुद्ध आणि त्यांचा धम्मा मध्ये सांगितले आहे. संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान. तो संघ भारतात कुठे ही कोणत्याही राज्यात दिसत नाही.त्यांचे आत्मचिंतन आणि परीक्षण बुद्ध जयंती निमित्याने केले पाहिजे. तर त्यासाठी हा लेखप्रपंच

जगात अनेक वस्तुचा शोध लागला त्यामुळे मानव जातीचा मोठा फायदा झाला,पण त्याच बरोबर नुकसान सुध्दा झाले.ती वस्तु म्हणजेच आरसा!.आरशात प्रत्येकचे प्रतिबिंब दिसते आणि जसे आहे तसेच दिसते.मनातील विकार ही आरसात दिसतात. जगात एकमेव महामानव असे आहेत की ज्यांचा जन्म,ज्ञान प्राप्ती आणि महापरीनिर्वाण एकाची दिवशी म्हणजे वैशाख पौर्णिमेला झाले. त्यामुळे वैशाख पौर्णिमा हा दिवस जगातील १८० देशात राष्ट्रीय उत्सव म्हणून खूप वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.भूख्खू संघाला दान दिल्या जाते,काही उपासक लहानपणीच मुलांना संघाला धम्माला दान देतात.

वैशाख पौर्णिमेच्या दिवसी गौतमाचा जन्म लुंबिनी शक्य राज्य नेपाल येथे झाला.याच दिवशी वैशाख पोर्णिमा सात वर्ष कठोर तपचार्या करून गया बिहार येथे त्यांना ज्ञान प्राप्ती झाली.आता ती बुद्ध गया म्हणून ओळखली जाते.आणि वैशाख पोर्णिमा याच दिवशी वयाच्या ८० वर्षी त्यांचे कुशीनगर उतर प्रदेश येथे महापारीनिर्वान झाले. तथागत बुद्धांनी सांगितले होते,अंत दिप भव,स्वयं प्रकाशीत व्हा महान संदेशाचा आम्ही अर्थच समजुन घेतला नाही.कारण आम्ही विचाराशी प्रामाणिक नाही.प्रामाणिकपणा ही फार महागडी वस्तु आहे. कुठल्याही फालतू माणसाकडून त्याची अपेक्षा करू नका असे बुद्ध नेहमी सांगत होते.विचारावर विस्वास ठेउन प्रमाणिक पणे वागलात तर तुम्हाला आयुष्य हसवेल,तेव्हा समजा की हे चांगल्या कर्माचे फळ आहे.आणि जेव्हा आयुष्य रडवेल तेव्हा समजा की आता चांगले कर्म करण्याची वेळ आली आहे.मोदी भारतात असले कि मनुवादी विचारांचे कट्टर समर्थक असतात.परदेशात गेले कि बुद्ध शिवाय दुसरे नांवच घेत नाही.बुद्धाची संघ शक्ती तिकडे गेल्यावरच आठवते.बुद्धाने सांगितलेला धम्म आणि त्यानुसार बनविलेला संघ तो पर्यत का आठवत नाही.ते म्हणतात संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान.

तथागत बुद्धानी वैशाख प्रोर्णिमाला जगाला जो मानव मुक्तीचा मार्ग दाखविला त्यालाच धम्म म्हणतात.धम्म म्हणजे जीवन जगण्याचा मार्ग त्या मार्गाने जाण्यासाठी पंचशीलाचे पालन केले पाहिजे. पंचशीलेचे पालन आपण केले तर दररोजच्या जगण्यातील अनेक विकार नष्ट होतात.आणि विचार आचरणात आणले तर स्वताचा विकास व कल्याण कोणीच रोखु शकत नाही. ते समजून घेण्या करीता आदर्श आणि प्रेरणा स्रोत समजून घेतले पाहिजे.वैशाख प्रोर्णिमा किंवा बुद्ध प्रोर्णिमा व बुद्धाची शिकवण आरशा सारखी असते. ते समजून घेण्यासाठी धम्मात व धर्मात गुरु शिष्य परंमपरेला खुप महत्व आहे.एका गुरूच्या घरी एक शिष्य मनोभावे गुरुची सेवा करून शिक्षण घेत होता. त्याच्या त्या सेवेमुळे गुरु त्याच्यावर प्रसन्न होतात. शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी घरी जाण्यासाठी निघाला तेव्हा गुरुकडे त्याने जाण्याची आज्ञा मागितली तेव्हा गुरुनी त्याला आशीर्वाद म्हणून एक आरसा भेट दिला व सांगितले की, हा दिव्य आरसा (दर्पण) असून यात मानवी मनात चालणारे विचार प्रगट होऊन दिसतात. विद्यार्थी मोठा आनंदीत झाला.हा आरसा खरेच कार्य करतो की नाही याची शहानिशा करण्यासाठी त्याने लगेच आपल्या गुरु समोर हा आरसा धरला व गुरुच्या मनात कोणते भाव आहेत, दुर्गुण आहेत हे पाहू लागला आणि गुरुच्या समोर आरसा धरताच त्याच्या चेह-यावरचा रंग पार उडाला कारण तो आरसा गुरुच्या अंतकरणात मोह,अहंकार, क्रोध आदि विकार दाखवित होता. त्याला याचे फारच दु:ख झाले की आपण ज्या गुरुची मनोभावे पूजा केली,ज्यांना पूर्ण देवाचा दर्जा दिला त्यांच्या मनात ही विकार आहेत, ते सुद्धा मानवी विकारापासून अजून सुटलेले नाहीत याचे त्याला वाईट वाटले. तो गुरुना काहीच न बोलता तो आरसा घेवून गुरुकुलातून निघाला.

रस्त्यात भेटणा-या प्रत्येकाच्या मनातील भाव पाहणे हे त्याचे कामच झाले होते. गावी परत जाताच त्याने आपल्या प्रत्येक परिचिता बरोबर हा प्रयोग करून पाहिला. त्याला प्रत्येकाच्या ह्रदयात कोणता ना कोणता दुर्गुण दिसून आला. शेवट त्याने आपल्या जन्मदात्या आई वडीलांच्या समोरही हा आरसा ठेवला.ते दोघेही पण त्यातून सुटले नाहीत. त्यांच्या ह्रदयात पण त्याला काही ना काही दुर्गुण दिसले.शेवटी या गोष्टीचा त्याला मनोमन खूप राग आला व तो परत गुरुकुलातील गुरुंकडे धावला. गुरुपाशी जाऊन मोठ्या विनम्रपणे तो म्हणाला,'' गुरुदेव,मी आपण दिलेल्या या आरशातून प्रत्येकाच्या मनात,ह्रदयात,अंत:करणात डोकावून पाहिले आणि मला असे जाणवले की प्रत्येकाच्याच मनात काही ना काही विकार आहेच,काही ना काही दोष आहे. एखाद्याच्या मनात कमी तर कुणाच्या मनात जास्त असे विकार,दोष भरून राहिले आहेत. हे पाहून मी फार दु:खी झालो आहे, कृपया मला मार्गदर्शन करा. गुरुनी काहीच न बोलता तो आरसा फक्त त्याच्याकडे केला आणि काय आश्र्चर्य त्याला त्याच्या मनाच्या प्रत्येक कोप-यात राग,द्वेष,अहंकार,क्रोध,माया आदि दुर्गुण भरून राहिलेले दिसले. गुरुजी म्हणाले,वत्सा,हा आरसा मी तुला तुझे दुर्गुण पाहून ते कमी करण्यासाठी दिला होता पण तू तर दुस-यांचे दुर्गुण पाहत बसलास आणि नको तितका वेळ खर्च केलास, अरे याच कालात जर तू जर स्वत:चे अवलोकन केले असते,तर तुला तुझ्यातील दुर्गुण सुधारता आले असते.याच काळात तु एक असामान्य व्यक्ती झाला असता. मानवाची ही कमतरता आहे,कमजोरी आहे की तो दुस-यातील दुर्गुण पाहत बसतो आणि स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्नही करत नाही. हेच या आरशातून मला तुला शिकवायचे होते. जे तुला शिकता आले नाही.लक्षात ठेवा आपण नेहमीच दुस-या व्यक्तीचे दुर्गुण बघतो, त्यावर टीका करतो पण आपल्यातील दुर्गुणांवर आपले कधीच लक्ष जात नाही.म्हणूनच ही वैशाख प्रोर्णिमा व बुद्धाची शिकवण आरशा सारखी असते.

भारतातील बुद्धाच्या धम्माचे ही असेच झाले बुद्धाने सांगितलेल्या धम्माचे पालन न करता ते इतरांच्या धर्मावर सतत टिका टिपणी करीत राहतात.बुद्धाच्या धम्मा बद्दल आलेला सकारात्मक विचार यांच्या आचरणातून व्यक्त होत नसल्यामुळे ते जगातील सर्व श्रेष्ठ धम्माला नकारात्मक दृष्टीने पाहतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली तथागतच्या बुद्ध धम्माची दिक्षा दिली.वैशाख प्रोर्णिमा किंवा बुद्धाच्या धम्माच्या प्रवचनाचा अर्थ समजु शकले नाही.आज ही ९० टक्के लोक पंचशिलेचे पालन करीत नाही. पंचशील म्हणजे काय?.हेच समजत नसेल तर अंमलात आणण्याचा प्रश्नच राहत नाही.त्यामुळेच आंबेडकरी समाजात टोकाचे विकार ठासुन भरले आहेत.त्यात कोणीच अशिक्षित किंवा सुशिक्षित माघार घेण्यास तयार नाही.म्हणुन बुद्ध प्रोर्णिमा व बुद्ध धम्माच्या शिकवणीचा आरसा प्रत्येका जवळ हवा आहे.तो हरविल्या मुळे मातृसंस्था,पिपल संस्था,समता सैनिक दल,रिपाई,बहुजन,वंचित, समिती,कृती समिती एकूण आंबेडकरी चळवळ भक्त आणि शिष्यात विखुरल्या गेल्या आहेत.नगरा नगरात हेच चित्र निर्माण झाले आहे.आज प्रत्येका कडे आरसा आहे पण तो त्यात स्वताचे प्रतिबिंब पाहत नाही.इतरा चे मात्र आवर्जुन पाहतो आणि भाष्य करतो.त्यात सत्य लिहण्याची बोलण्याची मांडण्याची हिंमत कोणी केल्यास त्यांचे परिणाम समाजात अतिशय वाईट होत आहेत.त्यामुळे कोणी बोलण्याची लिहण्याची हिंमत करीत नाही. पंचशील लागु होत नसेल तर बुद्ध आणि त्यांचा धम्मा मधील कोणते विचार आम्हाला चालतील?. बुद्धाचे विचार आणि शिकवण आरसा सारखी सोबत ठेवावी लागेल.तरच भारत बौद्धमय होईल.त्यासाठी संघ शक्ती हवी.संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान. लोकसभा निवडणुकीत आंबेडकरी विचाराचा बौद्ध विचारवंत साहित्यिक लेखक,पत्रकार मुंबई ते नागपूर पर्यन्त कोणा विचारधारे सोबत होता हे त्यांनी जाहीरपणे सोशल मोडियावर पत्रक काढून दाखवून दिले. म्हणूनच मि लिहतो पण संघ कुठे आहे?.

भारत ही तथागत गौतम बुद्धाची जन्मभूमी आहे.बुद्धाचा जन्म कुठे झाला?.लिबूंनी!. ज्ञानप्राप्ती कुठे झाली?.गया बुद्धगया!. महानिर्वाण कुठे झाले ?.कुशीनगर!. त्यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तिन्ही घटना वैशाख प्रोर्णिमाला भारतात घडल्या त्यामुळेच त्यांचे भारताचे जागतिक पातळीवर खुप महत्व आहे. भारतातील मनुवादी मानसिकता असणाऱ्या लोकांनी येथे तिचे वैशाख प्रोर्णिमाचे महत्व कितीही कमी करण्याचा प्रयत्न केला तरी मानवतावादी विज्ञानवादी बौद्ध धम्माचा सिद्धांतावरून तथागत बुद्ध जगातील सर्वोत्तम महापुरुष मानव प्राण्यांचे मार्ग दाते ठरले.चीन,जपान ,व्हियेतनाम,थायलंड,म्यानमार,श्रीलंका,सिंगपूर,अमेरिका,कंबोडिया, मलेशिया,नेपाळ,इंडोनेशियासह जगाच्या पाठीवर १८० देशातील बौद्ध धम्म मानणारे लोक हा राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करतात.कारण त्यांच्या मैत्रीभावना संघ शक्ती कुठून कुठून भरलेली आहे.म्हणूनच ते म्हणतात. संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा, क्यो की संघ बडा बलवान. आम्ही नागपूरच्या दीक्षाभूमी वरून जाहीरपणे सांगतो आम्ही कोणत्या विचारांच्या संघ सोबत आहोत.मुंबई दादरच्या चैत्यभूमी पर्यन्त त्यांचा आवाज पोचतो. मैत्री भावना कोणा सोबत ठेवावी आणि शत्रू भावना कोणा बरोबर पाळावी हेच ठरविण्याचे एकमत आमच्यात नाही. मग सांगा संघ बडा बलवान,संघ करेगा सबकी रक्षा,पण संघ कुठे आहे ?.

जगात ज्यांनी बुद्धाचा मानवतावादी विज्ञानवादी बौद्ध धम्माचा सिद्धांत समजून घेतला ते देश सर्व गोष्टीने वैभवशाली वैभवसंपन्न आहेत.बुद्ध पौर्णिमा व बुद्धाची शिकवण आरशा सारखी असते.त्यात प्रत्येक मानवांनी आपली प्रतिमा पाहिलीच पाहिजे.तरच बुद्ध पौर्णिमा व बुद्धाची शिकवण आपल्याला समजून घेता येईल. जागरूक वाचकांना माझ्याकडून व माझ्या लोकप्रिय दैनिकाच्या वतीने वैशाख पौर्णिमा व बुध्द जयंतीनिमित्त हार्दिक मंगल कामना!.सर्वांचे मंगल हो!!!.

**सागर रामभाऊ तायडे,भांडूप मुंबई,९९२०४०३८५९.**

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894